PARLE **MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE **MAHOTSAV**

दि. १९.१२.२०१३

**कृपया प्रसिद्धीकरिता**

# पार्ले महोत्सवाचे उद्घाटन होणार गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते
## मेजर ध्यानचंद यांच्या सुपुत्रांची विशेष उपस्थिती
## कला स्पर्धा परिसरास विनय आपटे यांचे नाव

मुंबई, : १४ व्या पार्ले महोत्सव या कला-क्रिडा सोहळ्याचे उद्घाटन दि. २१ डिसेंबर रोजी भारतीय जनता पार्टीचे लोकसभेतील उपनेते श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी स्व. मेजर ध्यानचंद यांचे दोन्ही सुपुत्र श्री. अशोक कुमार व श्री. ब्रिजमोहन सिंह यांची विशेष उपस्थिती असणार आहे. तसेच कला, क्रिडा व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांचीही उपस्थिती उद्घाटन सोहळ्यात असेल, अशी माहिती पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक ॲड. पराग अळवणी यांनी दिली आहे.

पार्ले महोत्सवाच्या उद्घाटनाला वरील मान्यवरांव्यतिरिक्त श्री. देवेंद्र फडणवीस, विनोद तावडे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष रामदास आठवले, युवा सेनेचे अध्यक्ष आदित्य ठाकरे, आशिष शेलार, पूनम महाजन, डॉ. किरीट सोमैय्या, खासदार पियुष गोयल, खासदार स्मृती इराणी इत्यादी नेते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. शिवाय, स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी दरदिवशी विविध मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

उत्तरोत्तर लोकप्रिय होत असलेल्या पार्ले महोत्सवाला यावर्षी उदंड प्रतिसाद लाभला आहे. यावर्षी स्पर्धकांची संख्या वाढल्यामुळे महोत्सव दरवर्षीपेक्षा चार दिवस अधिक चालणार आहे. या महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यावर असून स्पर्धा सुरळीत चालण्यासाठी शेकडो कार्यकर्ते झटत आहेत. साठ्ये महाविद्यालयाच्या सहकार्याने होणाऱ्या या समारंभात कला आणि सांस्कृतिक स्पर्धा महाविद्यालयात तर क्रिडा स्पर्धा वामन मंगेश दुभाषी मैदानावर होणार आहे. साठ्ये महाविद्यालयातील कला स्पर्धेच्या परिसरास स्वर्गीय विनय आपटे नगर तर दुभाषी मैदानातील क्रीडा नगरीस भारतरत्न सचिन तेंडुलकर गौरवांगण असे नाव देण्यात येणार असल्याची माहिती ॲड. पराग अळवणी यांनी दिली आहे.

महोत्सवातील मॅरेथॉन, सुदृढ बालक स्पर्धा, महिलांसाठी होम मिनिस्टर स्पर्धा व ज्येष्ठ नागरिकांच्या वैविध्यपूर्ण स्पर्धा तसेच चित्रकला, व्यंगचित्रकला, स्वरचित काव्यवाचन स्पर्धा यांसाठी इच्छुकांनी २६१३६५१३ या क्रमांकावर संपर्क साधावा. मात्र अन्य स्पर्धांची नोंदणी प्रचंड प्रतिसादामुळे बंद करण्यात आली आहे. दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी नागरिकांनी १४ व्या पार्ले महोत्सवास मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

---

सदर पत्रक श्रीकृष्ण आंबेकर, कार्यालय प्रमुख, पार्ले महोत्सव यांनी प्रसिद्ध केले आहे.